# डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि बौद्ध धम्म दिक्षा

**डॉ. कल्पना सांगोळे**
इतिहास विभाग प्रमुख
एस.एस. जायस्वाल महाविद्यालय
अर्जुनी मोरगाव जि. गोंदिया

## प्रस्तावना

एका अमेरिकन विश्वविद्यालयाने “दि इव्हेंट दॅट मूव्हड द होल वर्ल्ड” नामक ग्रंथात जगातील शंभर अविस्मरणीय घटनांचा उल्लेख केला. त्यात भारतातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १४ ऑक्टोबर १९५६ साली ‘अशोक विजयादशमी’ ला नागपूरच्या दीक्षाभूमीवर केलेले धम्मचक्र प्रवर्तन ह्य घटनेचा विशेष उल्लेख केला आहे.

तथागत बुद्धाने सारनाथला फक्त पाच जणांना धम्मदीक्षा दिली होती. अडीच हजार वर्षानंतर बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी नागनगरीत नागपूर येथे पाच लक्ष अनुयायांना धम्मदीक्षा दिली. ऐतिहासिकदृष्ट्य ही घटना जगाला आश्चर्यचकीत करणारी होती. अनेक राष्ट्रप्रमुखांनी त्यांचे अभिनंदन व स्तुतिसुमनांचा वर्षाव केला. महापंडित राहूल सांकृत्यायन म्हणालेत, “बाबासाहेबांनी बुद्ध धम्माची दीक्षा घेऊन असा प्रचंड धम्मस्तंभ भारतभूमीत उभारला आहे की, ज्याला आता कुणीही हलवू शकणार नाही.” डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणालेत, “काही काळ जगलो तर भारत बुद्धमय केल्याशिवाय राहणार नाही. आता भारतात आलेली ही बौद्ध धर्माची लाट कधीही परत फिरणार नाही.”१३ ऑक्टोबर १९३५ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी नाशिकजवळील येवले येथे धर्मांतराची केलेली घोषणा १४ ऑक्टोबर १९३५ या दिवशी धर्मांतर करून प्रत्यक्ष कृतीत उतरवली. भारतातील अतिशुद्र गणलेला कनिष्ठ समाज वरिष्ठ हिंदूसमाजाच्या सामाजिक, धार्मिक नि राजकीय गुलामगिरीच्या गर्तेत तसाच गंजत, कुजत आणि सडत पडला होता. युगानुयुगे अस्पृश्य, आदर्शनीय, अवर्ण, अत्यंज, अतिशूद्र, नामशूद्र गणलेल्या ह्य समाजात थोडी प्रगतिपर हालचाल दिसू लागली होती. तरी त्याच्यामध्ये आत्मतेज, आत्मविश्वास, स्वाभिमान म्हणजे माणुसकीचे नवचैतन्य निर्माण करण्याचे महान कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनीच केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा उदय हे आधुनिक भारताच्या इतिहासातील तेजस्वी नि शाश्वत मूल्यांचे दर्शन घडविणारे एक महान पर्व होय.

## येवला परिषदेत धर्मांतराची घोषणा :

१९३५ मध्ये रमाई आंबेडकरांचा निधन झाला. त्यानंतर डॉ. आंबेडकरांनी लॉ कॉलेजचे प्रिन्सिपल म्हणून पदभार सांभाळला. याच काळात यांचा कल बौद्ध धम्माकडे चालला होता. त्यांचे स्पष्ट मत होते की, जापर्यंत जातीयवाद दूर होत नाही, तोपर्यंत दलित समाजाला कोणताही फायदा होणार नाही. आपल्या दलित समाजाला हिंदू समाजामध्ये इतर घटकांप्रमाणे बरोबरीचे स्थान मिळावे म्हणून बाबासाहेबांनी सतत १० वर्षे आटोकाट प्रयत्न केले. परंतु हिंदू धर्म हा दगडाचा धर्म आहे. त्याच्यापुढे कपाळ फोडून घेतले तरी काही उपयोग होणार नाही याची प्रचिती त्यांना झाली.

१३ ऑक्टोबर १९३५ रोजी येवला येथे परिषद भरविली. या परिषदेत हजारोंच्या संख्येने तेथे दलित समाज जमा झाला होता. या परिषदेत भाषण करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले, "आपले माणुसकीचे साधे अधिकार मिळविण्यासाठी आणि हिंदू समाजामध्ये समान दर्जा प्राप्त करून घेण्यात आपली चळवळ निष्फळ ठरली आहे. त्या चळवळीसाठी व्यतीत केलेले श्रम, काळ, आणि धनही वाया गेली आहेत. जो धर्म आपल्याला समान दर्जा देईल, समान हक्क आणि योग्य तऱ्हेने वागविल अशा एखाद्य दुसऱ्या धर्मात जावे असे तुम्हाला वाटत नाही काय? धर्मांतर करण्याशिवाय आपल्या समोर तरी पर्याय दिसत नाही. धर्मपरिवर्तन करूनच आपल्या लोकांचा उद्धार करू शकतो."

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी धर्मांतराचा हा निर्णय काही अचानक घेतलेला नव्हता किंवा क्षणिकही नव्हता. हा अनेक वर्षापासून हिंदू धर्मात आणि त्यांच्या सारख्या अस्पृश्यांना असमानता आणि अपमानाच्या भावनांचा दंश होता. ज्याला सहन करून ते तत्कालीन परिस्थिती समोर पराभूत झाले होते. याच परिषदेत आपल्या भाषणाच्या शेवटी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी "माझा जन्म अस्पृश्य म्हणून झाला यात माझा काही दोष नाही, परंतु मरतांना मात्र मी हिंदू म्हणून मरणार नाही." अशी भीमप्रतिज्ञा केली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी धर्मांतराची भीमगर्जना केल्यावर भारतीय समाजात, राजकीय आणि धार्मिक क्षेत्रात प्रचंड खळबळ माजला. गांधीजी आणि सावरकरांसारख्या नेत्याने दु:ख व्यक्त केले. तर देशाच्या सर्व कानाकोपऱ्यातून त्यांच्यावर तारांचा नि पत्रांचा वर्षाव झाला. भारतीय अस्पृश्यांच्या जीवनात एक नवे पर्व सुरू झाले.

मुस्लीम, शिख, ख्रिश्चन व बौद्ध धर्माचे प्रतिनिधी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना आपल्या आपल्या धर्मात येण्याचे आग्रहपूर्वक निमंत्रण, आश्वासने व प्रलोभने देऊ लागले.

- हैद्राबादचे निजाम तर आपल्या जून्या कोट्यतील कोट्यवधी रूपये देण्याचे आमिष दाखवू लागले.
- मुसलमानांचे धार्मिक नेते आंबेडकरांभोवती घिरट्य घालू लागले.
- ख्रिश्चन धर्मिय देखील बाबासाहेबांना आपल्या जाळ्यत ओढण्याचे प्रयत्न करू लागले.
- शीख पुढारी म्हणाले, "अस्पृश्यांना आवश्यक असणाऱ्या सर्व गोष्टी शीख धर्म देऊ शकतो."

अशाप्रकारे बाबासाहेबांच्या धर्मांतराच्या घोषणेनंतर अनेकांनी आपली वेगवेगळी प्रतिक्रिया व्यक्त केली. मात्र बाबासाहेब आंबेडकर यांचे मत ठाम होते, त्यांचा निर्णय अटळ होता. ते आपल्या अनुयायांना म्हणतात, "धर्म हा मनुष्याकरिता आहे. मनुष्य धर्माकरिता नाही. जो धर्म तुम्हास पाणी मिळू देत नाही, तो धर्म या संज्ञेला अपात्र आहे, जो धर्म तुम्हाला शिक्षण मिळू देत नाही, तुमच्या ऐहिक उत्कर्षाच्या आड येतो, तो धर्म या संज्ञेला पात्र नाही, जो धर्म आपल्या अनुयायांना आपल्या धर्मबांधवांशी माणुसकीने वागण्यास शिकवीत नाही, तो धर्म नसून रोग आहे, जो धर्म अज्ञानांना अज्ञानी रहा, निर्धनांना निर्धन रहा असे म्हणतो, तो धर्म नसून शिक्षा आहे!"

शेवटी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या सहकाऱ्यांच्या संमतीने व हिंदू महासभेचे प्रमुख नेते यांच्या पाठींब्याने शीख धर्माची दीक्षा घ्यावयाचे ठरविले. शीख हा परका धर्म नव्हे असे हिंदूमहासभेचे पुढारी मानीत. हिंदू धर्माचाच तो एक पंथ आहे असे मानती शीख आणि हिंदू यांच्यामध्ये लग्ने होत असत. शीख लोक हिंदूमहासभेचे सभासद होते. लाला लजपतरायांची आई शीख पंथातील होती.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपण शीख धर्म का स्विकारीत आहोत याविषयी एक निवेदन तयार केले होते आणि त्यात त्यांनी म्हटले होते की, "हिंदू हिताच्या दृष्टीने त्यातल्यात्यात कोणता धर्म स्विकारावा? मुसलमानी, ख्रिश्चन की शीख? उघडच सांगायचे म्हणजे शीख धर्म हाच सर्वात उत्तम धर्म.

जर अस्पृश्यांनी मुसलमानी धर्म अथवा ख्रिश्चन धर्म स्विकारला तर ते हिंदू धर्माच्या कक्षेबाहेर जातात. इतकेच नव्हे तर हिंदू संस्कृतीबाहेर जातात. उलटपक्षी, जर अस्पृश्य शीख झाले, तर ते हिंदू संस्कृतीत राहतात, हा हिंदूंना काही लहान सहान फायदा नाही.”

डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणखी म्हणाले की, “अस्पृश्यांच्या धर्मांतरामुळे सर्वसाधारणपणे देशावर काय परिणाम होतील हे लक्षात ठेवण्यासारखे आहे. अस्पृश्य जर मुसलमानी किंवा ख्रिस्ती धर्मात गेले तर अस्पृश्य लोक अराष्ट्रीय होतील. ते जर मुसलमान झाले तर त्यांची संख्या दुप्पट होईल. आणि मुसलमानांचे वर्चस्व वाढेल. ते जर ख्रिश्चन झाले, तर ख्रिश्चनांची संख्या पाच–सहा कोटी होईल व मग ब्रिटीश सत्तेची ह्या देशावरील मगरमिठी घट्ट बसण्यास त्यामुळे साध्य होईल. उलट जर ते शीख धर्मात गेले तर त्यामुळे हिंदूस्थानच्या भवितव्याला धोका पोचणार नाही. एवढेच नव्हे तर देशाचे भवितव्य घडविण्यास सहाय्यभूत होतील. ते अराष्ट्रीय बनणार नाहीत. उलट ते देशाच्या राजकीय प्रगतीस हातभार लावतील.” यावरून बाबासाहेबांचा दूरदृष्टीपणा दिसून येतो.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर शेवटी म्हणातात, “जर अस्पृश्यांनी धर्मांतर करावयाचेच असले तर त्यांनी देशहिताच्या दृष्टीने शीख धर्मात जावे. मी हिंदू समाजाच्या भवितव्याला काही अंशी जबाबदार आहे असे मी मानतो. म्हणून हा पर्याय मी मान्य केला आहे.” याच संबंधात ते म्हणतात, “जर माझ्या मनात द्वेष असता नि सूडाची भावना असती तर पाच वर्षाच्या आत मी ह्या देशाचे वाटोळे केले असते.” हे उद्‌गार एका महान आणि उदात्त अशा थोर भारतपुत्राचे आहेत हे लक्षात ठेवायला पाहिजे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, “धर्माने बंधुभाव, समता नि स्वातंत्र्य या सद्‌गुणाची शिकवण दिली पाहिजे.” डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते, मुसलमान धर्म खऱ्या धर्मनिष्ठ मुसलमानाला हिंदूस्थान आपली मायभूमी आहे आणि हिंदू आपला इष्टमित्र आहे असे मानु देत नाही. मुसलमान हा समाज सामाजिक सुधारणेचा विरोधक आहे. इस्लामचे बंधुत्त्व हे सर्वव्यापक नाही. ते बंधुत्त्व मुसलमान समाजाच्या अनुयायापुरतेच असते. असे मत त्यांनी आपल्या ”थॉट्स ऑन पाकिस्थान” ह्या ग्रंथात म्हटले आहे. मुसलमान धर्माविषयी त्यांचे मत अशाप्रकारचे असल्यामुळे ते मुसलमान धर्म स्विकारणे शक्यच नाही हे दिसून येते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ‘स्वातंत्र्य, समता नि बंधुभाव ही तत्त्वे फ्रेंच क्रांतीतून घेतलेली नसून ती सूत्रत्रयी त्यांनी बाहेर धर्मातून उचलली आहे असे ते आग्रहाने प्रतिपादन करीत. ह्या तत्त्वाचा बुद्धाने अनुक्रमे ‘कालाम’, ‘अस्सलायन’ व ‘तैविज्य’ या सूत्रांतून केलेला आहे. ज्या धर्मांतराने अस्पृश्य समाज हिंदूसंस्कृतीत राहील, राष्ट्रीय वृत्तीचा राहील असेच धर्मांतर त्यांना करावयाचे होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शीख धर्मांचा अभ्यास करण्यासाठी आपले काही अनुयायी तसेच आपला मुलगा यशवंतलाही पाठविले होते. परंतु पुढे शीख नेत्यांशी त्यांचे मतभेद झाल्यामुळे शीख धर्म स्विकारण्याचा त्यांचा बेत रद्द झाला. त्यानंतर बाबासाहेब काही वर्षे राज्यकारभारात आणि राज्यघटनेच्या कार्यात गुंतल्यामुळे धर्मांतराचा विचार पुढे ढकलला गेला.

**बौद्ध धम्माची दीक्षा :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना हिंदूकडून दया, उपकार, आशीर्वाद नको होते. त्यांना हिंदूसमाजाचा पाया स्वातंत्र्य, समता व बंधुभाव आणि ऐक्य यावर उभा करावयाचा होता. हिंदू समाज रचना चातुर्वर्ण्यावर अधिष्ठित असल्यामुळे ती लोकशाहीस नि व्यक्ती स्वातंत्र्यास मारक आहे, असे त्यांचे मत होते. चातुर्वर्ण्यव्यवस्था नष्ट केल्याशिवाय हिंदू समाज तेजस्वी होणार नाही असे ते हिंदू समाजाला सांगत होते.

चातुर्वर्ण्यव्यवस्था नष्ट करणे म्हणजे नुसती स्पर्शबंदी, रोटीबंदी, व्यवसायबंदी तोडणे नसून बेटी बंदी तोडणे होय, असा त्यांनी निष्कर्ष काढला होता. हिंदू समाजसुधारकांना हे सर्व कळते, परंतु वळत नाही. हिंदू समाजसुधारक जातीमध्ये जन्मतात, आपल्या जातीमध्येच लग्न करतात आणि जातीमध्येच मरतात. हे बाबासाहेबाचे म्हणणे योग्यच होते. हिंदू समाजसुधारकांनी दाखविलेली अनास्था आणि त्यांनी सामाजिक समतेबाबत केलेली टाळाटाळ पाहून बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदू धर्मातील अनिष्ट चालीरिती आणि विचार यांना मूठमाती देऊन ते बुद्धप्रामाण्यावर अधिष्ठित असलेल्या तथागत भगवान बुद्धाच्या धम्माकडे आकृष्ट झाले.

भीमराव मॅट्रीक परीक्षा पास झाले त्यावेळी दलिताचे कैवारी गुरूवर्य कृष्णाजी अर्जुन केळूसकर सरांनी त्यांना मराठीत असलेली 'बुद्धचरित्र' ही पुस्तक बक्षिस दिले. बाबासाहेबाने ते पुस्तक वाचले तेव्हापासुनच त्यांच्यावर बुद्ध धर्माचा प्रभाव पडला होता.

'रिलीजन' म्हणजे धर्म हा वैयक्तिक असून ज्याने त्याने तो स्वत:पुरताच मर्यादित ठेवायचा असतो. धम्म म्हणजे मुलत: व तत्त्वत: तो सामाजिक आहे. अशी बाबासाहेबांनी धर्माची व्याख्या केली. मनुष्य एकटाच असला तर त्याला धम्माची आवश्यकता नाही. परंतु दोन माणसे कोणत्याही संबंधाने एकत्र येतात तेव्हा त्यांना आवडो अगर न आवडो धम्म हा पाहीजेच असा त्यांनी निष्कर्ष काढला. त्यांनी अनेक धर्मग्रंथ, धर्मकल्पना, धर्मतत्त्वे, धर्मविचार यांचा प्रचंड, मनपूर्वक अभ्यास केला. एवढी महान व्यक्ती आधुनिक जगात मिळणे शक्यच नाही. उच्च धर्मभावनेमुळे पावित्र्याचा नि सदाचाराचा आदर्श बळकट होतो, अशी त्यांची मनोभावना होती. मनुष्यास निर्बंधाच्या भयापेक्षा स्वत:च्या मनाचे भय असणे हे जास्त हितकारक असते असे त्यांचे मत असल्याचे दिसते.

१९५० पासून म्हणजे आयुष्याच्या शेवटच्या पर्वात बाबासाहेबांनी भारतात बौद्ध धर्माचे पुनरूज्जीवन करण्याचे ठरविले. त्यांनी ब्रम्हदेश व सिलोन या देशातील बौद्ध धर्माचे नेते व धर्मोपदेशक ह्यांच्याशी चर्चा केली. पुढे बाबासाहेबांनी देहूरोड येथे बांधलेल्या बुद्धविहारामध्ये बुद्धाच्या मूर्तीची स्थापना केली. बुद्धाच्या मूर्तीची बाराशे वर्षानंतर भारतात प्राणप्रतिष्ठा करण्याचा मान आपल्या दलित समाजाचा आहे, असे त्यांनी अभिमानपूर्वक जाहीर केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर बौद्ध धर्माची दीक्षा घेणार ही सुवार्ता ऐकून बौद्ध विचारवंत म्हणू लागले की, मानवजातीचे एक मोठे हितकर्ते अशी आंबेडकरांची इतिहासात नोंद होईल. आपलया अनुयायांसाठी बाबासाहेबांनी, 'बुद्ध आणि त्याचा धम्म' हा इंग्रजी भाषेतून ग्रथ लिहिला. धर्माची तीन कारणांमुळे अवनती होते असे त्यांनी सांगितले आहे. अबाधित धर्मतत्त्व, अष्टपैलू नि विजिगिषू वादविवाद पटू आणि सामान्य जनास समजण्यास सोपी अशी धर्मतत्त्वे यांचा अभाव ही तीन कारणे होत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यांच्या मानवी हक्कासाठी ब्रिटिश राजवटीत लंडन येथे गोलमेज परिषद गाजविली. महाडचा चवदार तळ्यचा सत्याग्रह, नाशिकचा काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह, मनुस्मृती दहन, अंबादेवी मंदिर प्रवेश इ. मानवमुक्तीचे लढे अहिंसेच्याच मार्गांनी लढविले. येवले येथील १९३५ सालची 'मी हिंदू म्हणून जन्मलो; परंतु हिंदू म्हणून मरणार नाही!' ही प्रतिज्ञा पूर्ण करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सम्राट अशोकाच्या धम्म घोषणेचा विजय दिवस 'अशोक विजयादशमी' १४ ऑक्टोंबर १९५६ या दिवसाची निवड केली. याच अशोक विजयादशमीला नागपूर येथील दीक्षाभूमीवर त्यांनी विषमतावादी हिंदू धर्माचा त्याग करून मानवतेच्या समतावादी बुद्ध धर्माची सपत्नीक बौद्ध धर्माचे विख्यात महास्थवीर चंद्रमणी ह्यंचे हस्ते दीक्षा घेऊन बौद्ध धम्माचा स्वीकार केला व भीमप्रतिज्ञा पूर्ण केली.

सोबतच आपल्या पाच लाख हिंदू अस्पृश्य बांधवांनाही बौद्ध धम्माची दीक्षा व धम्मराष्ट्र घडविणाऱ्या २२ प्रतिज्ञा देऊन हिंदू धर्मातील गुलामगिरीच्या जोखडातून मूक्त करून सीमोल्लंघन केले. सम्राट अशोकानंतर महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९५६ मध्ये अशोक विजयादशमीच्या ऐतिहासिक दिवशीच धम्मचक्र प्रवर्तन घडवून या भारतभूमीत लुप्त झालेले बौद्ध धम्माचे धम्मचक्र २५०० वर्षानंतर परत एकदा भारतभूमीवर गतिमान केले व बुद्ध धम्माचे पुनरूज्जीवन केले.

**समारोप :**

- डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपल्या धम्मचक्र प्रवर्तनाची पार्श्वभूमी स्पष्ट करताना म्हणतात, “ख्रिस्ती किंवा इस्लामी धर्म भारतात निर्माण झाले नाहीत, ख्रिस्ती अगर इस्लामी धर्मांनी आपली भारतीय संस्कृती नष्ट होईल आणि जातीवंत संस्कृती राखणे, हे बौद्ध धर्माचे रहस्य आहे. ते ज्यांना उमगेल, तेच माझ्या धर्मदीक्षेबद्दल मनात किंतु बाळगणार नाहीत. बौद्ध संस्कृतीचे पुनरूज्जीवन करणे व सर्व भारत बौद्ध करणे, हे माझे उद्दिष्ट आहे.” डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपले हे उद्दिष्ट समोर ठेवूनच बौद्ध संस्कृतीतील अशोक विजयादशमीचे पुनरूज्जीवर करण्यासाठी त्यांनी या दिनाची निवड जाणीवपुर्वक धम्मचक्र प्रवर्तनासाठी केली होती हे आवर्जुन लक्षात घेतले पाहीजे.
- डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १४ ऑक्टोबर १९५६ रोजी येथील लाखो दलित—वंचित शोषित बांधवांना सामुहिक पातळीवर बौद्ध धम्माची दीक्षा दिली. धम्मदीक्षा देताना बाबासाहेबांनी म्हटले, “मी तुम्हाला दीक्षा देऊन हिंदूंच्या बरोबरीने उभे केले आणि जगातील बौद्धांशी तुमचे बंधुत्वाचे नाते जोडून दिले आहे.” प्रत्यक्षात त्यामुळे धम्मदीक्षित बौद्धांचा स्वाभिमान गगनाला जाऊन भिडला. त्यांच्यातील न्यूनगंड लोप पावला.
- डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १४ ऑक्टोंबर १९५६ ला नागपूर येथे बौद्ध धर्माचा स्वीकार केला व आपल्या लाखो अनुयायांना कर्मकांड, अंधश्रद्धा, चमत्कार व दैववादाच्या अज्ञान अंधकारातून प्रकाशात आणले. त्यांच्या आशा आकांशा व त्यांना अपेक्षीत आकाश मोकळे करून दिले. तो धम्मदीक्षेचा क्षण म्हणजे केवळ पददलितांनाच नव्हे, तर अखिल मानव समूहाला ‘आत्मसन्माना’चे कवच प्रदान करणारा क्षण....!
- संपूर्ण भारतीय समाजजीवन धर्मसत्तेने वेढले गेलेले असताना आणि धर्म सत्तेच्या महाप्रचंड विळख्यात भारतातील दलित वंचितांचा श्वास कोंडला गेलेला असताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी नव्या धर्माचा शोध सुरू केला. त्यांचा हा शोध पर्यायी धर्माचा नव्हता, तर धर्मप्राय वाटणाऱ्या आणि तरीही धर्माच्या पलीकडे जाणाऱ्या अशा मानवी नीतिमत्तेचा शोध होता. तथागत गौतम बुद्धाच्या रूपाने व त्यांच्या विचारसरणीच्या रूपाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना नव्या जीवनमार्गाचा शोध लागला. हा जीवनमार्ग प्राचीन काळापासून बौद्ध धर्म या नावाने ओळखला जात असला तरी तो ‘धर्म’ बौद्ध ‘धर्म’ नसून धम्म असल्याचे त्यांना लक्षात आले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी येथील दीनदलितांसाठी व येथील तळपातळीवरील समाजासाठी बौद्ध धम्माची निश्चिती केली. आणि १४ ऑक्टोबर १९५६ ला येथील लाखो दलित बांधवांना सामूहिक पातळीवर बौद्ध धम्माची दीक्षा दिली. ही ‘धर्मदीक्षा’ नव्हती, तर ती ‘धम्मदीक्षा’ होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेला बौद्ध धम्माचा स्वीकार हा ‘बौद्धधर्मा’ चा स्वीकार नव्हे तर, तो ‘बौद्ध धम्मा’ चा स्वीकार आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेला बौद्ध धम्मस्विकार ही भारतीय पातळीवरील दलित–वंचितांच्या जीवनाची नवनिर्मितीची प्रक्रिया होती. ही प्रक्रिया आधुनिक काळातील मानव–मानवातील नव्या सहसंबंधाची व समतामूलक सहजीवनाची पायभरणीदेखील होती. त्यामुळेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेला बौद्ध धम्माचा स्वीकार हा नवभारताच्या जडणघडणीचा प्रारंभबिंदू ठरला.

**संदर्भ ग्रंथ सूची :**

- डॉ. बाबासाहेब आंबेडकर – भालचंद्र फडके, श्रीविद्या प्रकाशन, पूणे ३०, प्रथम आवृत्ती ऑक्टोबर १९८५
- दलित समाजाचे पितामह–डॉ. भीमराव आंबेडकर – डॉ. सुनील जोगी, डायमंड बुक्स प्रकाशन, दिल्ली, प्रथम आवृत्ती २०१५
- विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर मानस आणि तत्त्वविचार – धनंजय कीर
- समकालीन सहकाऱ्याच्या आठवणीतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर – विजय सुरवाडे, लोकवाङमय गृप, मुंबई, चौथी आवृत्ती २०१४
- महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर – क्रांती महाजन, सुविधा प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती २०१३
- माझी आत्मकथा – डॉ. बाबासाहेब आंबेडकर, चित्र प्रकाशन, सुगत नगर, नागपूर
- डॉ. बाबासाहेब आंबेडकर अनुभव आणि आठवणी नानकचंद रतू – भाष्कर लक्ष्मण भोळे, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती १९९८
- डॉ. बाबासाहेब आंबेडकर – चांगदेव भवानराव खैरमोडे, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती १९८८
- सकाळ 'दीक्षा' विशेषांक इ.स. २००७, २०१४, २०१५, २०२०